
डिसेंबर-२०१४
अनाहत
साहित्य संस्कृती प्रकाशन

# अनुक्रमणिका


किती बोलायचे राहून गेले ....................................................१०

जगण्याचि न आस अता उरली ............................................११

तू धुक्यासारखी मी उन्हासारखा ..........................................१२

वार्ता खरीच होती ..............................................................१३

खोटा खोटा वारा वाहत आहे ..............................................१४

संबंध कधी मी अपुला कोणाला सांगत नाही..........................१५

आभाळच कोसळले की मग कळून येते ................................१७

सुखाची आज अंतिम पातळी मी ...........................................१९

केलेस तर हे एवढे उपकार कर ...........................................२०

बदलून आज पाहू काळासमान आपण..................................२२

तो माझा.............................................................................२४

दोघात हजारो मैलांचे अंतर येऊ शकते.................................२७

मनाला आपल्या समजावतो आपण .......................................२८

मला जेव्हा समेवर यायचे असते...........................................२९

चांदण्या मोजायची ही वेळ नाही .........................................३०

तुझा फक्त साधा शहारा असावा...........................................३२

सुखस्वप्न ...........................................................................३३

प्रार्थनेस काय ढोल पाहिजे ....................................................३४
सुगंधी एक शिंपण..............................................................३५
कसे पंजरी मी शरांच्या निजावे ..............................................३७
शब्दांत जितके गुंतावयाचे, गुंतून झाले ..................................३८
किंमत ...................................................................................४०
ढोल.......................................................................................४२
आभाळरस्ता...........................................................................४३

# अनाहत -डिसेंबर २०१४ - गझल विशेषांक

मराठी  गझल जगाच्या कानाकोप-यात पोहोचली आहे. अनाहतचा हा अंक गझलांचा अंक आहे. गझल विशेषांक करायचे ठरल्यावर अनेकांनी त्यांच्या गझला आम्हाला ईमेल केल्या.  "सुरेश भट गझल रंगमंच"च्या माध्यमातून जे गझलकार गझला सादर करतात त्यांच्या गझला या अंकात आहेत. तसेच गझल हा काव्यप्रकार जाणीवपूर्वक हाताळणा-या कवींच्या निवडक गझलांचाही या अंकात समावेश केला आहे.

गझलेवर प्रेम करणा-या प्रत्येकापर्यंत आमचा हा प्रयत्न पोहचवण्यासाठी रसिक वाचकांनी सहकार्य करावे अशी विनंती.

मराठी गझल रूजवणारे आणि तिचे योग्य संगोपन करणारे आदरणीय सुरेश भट यांना साहित्यसंस्कृतीतर्फे विनम्र अभिवादन.

-सोनाली जोशी

## मनोगत

गझल हा काव्यप्रकार अरबीतून-फ़ारसी.... फारसीतून उर्दू... असा प्रवास करत करत मराठीत आला आणि मराठी कविताविश्वात घट्ट रूजून बसला. द्राक्षाच्या भूमीतून रुद्राक्षांच्या भूमीकडे ही वाटचाल झाली असे गमतीने म्हटले जाते. मराठी काव्यात गझल हा प्रकार सर्वप्रथम माधव ज्यूलियन यांनी आणला असे मानले जाते. पण हे अंशतः सत्य आहे.ज्यूलियनांच्या पुर्वी सुद्धा गझलेच्या आकृतीबंधात रचना होत होत्या .पण "या आकृतीबंधातील रचना म्हणजे गझल" अशी ओळख सर्वप्रथम माधवरावांनी करून दिली. आज वापरल्या जाणा-या जवळजवळ सर्व वृत्तामंध्ये त्यांनी रचना केली पण ती गझलेच्या परिपुर्ण आकृतीबंधातील भावकविताच - दर्जेदार भावकविता होती.

गझल या काव्यप्रकाराचे सर्व व्याकरण, यम-नियम काटेकोरपणे सांभाळून विशेषतः त्यातील गझलियत केंद्रस्थानी ठेवून मराठीत सर्वार्थाने परिपुर्ण गझल आणली ती गझल सम्राट सुरेश भट यांनीच ! म्हणूनच त्यांना मराठीतील आद्य गझलकार म्हटले तर वावगे ठरणार नाही.

"एकाच वृत्तात लिहिलेली... दोन दोन ओळींची किमान पाच कडवी (शेर) असलेली, पहिल्या शेरातील दोन्ही ओळींमध्ये

आणि नंतरच्या प्रत्येक शेरातील दुस-या ओळींमध्ये यमक-अंत्ययमक असलेली कविता म्हणजे गझल"अशी ढोबळ मानाने गझलेची व्याख्या भट साहेबांनी केली आहे. कवितेत एकच भाव सुरवातीच्या कडव्यापासून शेवटपर्यंत उलगडत जातो. गझलेत मात्र प्रत्येक कडव्यात म्हणजे शेरात वेगवेगळा विचार मांडलेला असू शकतो.या अर्थाने गझलेचा प्रत्येक शेर हा स्वतंत्र - स्वयंभू कविता असतो.तो वेगळा करून सुभाषिताप्रमाणे वापरला जाऊ शकतो - वापरला जातो. म्हणूनच गझलेला"कवितांची कविता "म्हटले जाते.

आपल्या संपूर्ण हयातीत गझल सम्राट सुरेश भट यांनी मराठी गझल रुजवण्यासाठी जाणीवपुर्वक प्रयत्न केले. महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेर अनेक ठिकाणी फ़क्त मराठी गझलेचे कार्यक्रम केले. गझल लिहू शकणा-या - इच्छिणा-या नवोदितांना मार्गदर्शन केले. आज त्यांच्यानंतरच्या पिढ्यांमधील सुमारे २०० कवी गझला लिहित आहेत.त्यापैकी सुमारे पन्नास ऐन तिशीतील तरूण गझलकार आहेत ही आश्वासक बाब.ह्या तरूण गझलकारांना योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देऊन रसिकांशी त्यांची नियमीत भेट घडवून आणण्याचे काम सुरेश भट गझलमंच सातत्याने करीत आहे.

या संस्थेच्या स्थापनेचा किस्सा वेगळाच...

"वैराळकरजी,निवडक ७-८ गझलकारांचा दोन तासांचा मराठी गझल मुशायरा पणजी येथे आयोजित करायचा,जमेल?"
गोवा राज्य वस्तुसंग्रहालयाच्या संचालक गझलकारा राधा भावे यांचा फोन...सहकारी मंडळींशी बोलून होकार दिला.दुस-या दिवशी पुन्हा फोन,"मुशाय-याला नाव काय द्यावे ?....वैभव जोशी,ममता,सुधीर शी बोललो..."गझलरंग"कळवून टाकले..लगेच पुन्हा फोन,"आयोजक संस्थेचे नाव?"....

अशा रितीने,सुरेश भट गझलमंच'आणि,'गझलरंग'या दोन गझलसंज्ञा अस्तित्वात आल्या...

स्थापना आणि शुभारंभ मुशायरा दिनांक-२९ एप्रील २०१२...ठिकाण-गोवा राज्य वस्तुसंग्रहालयाचे टुमदार देखणे सभागृह,पणजी.

गेल्या अडीच वर्षांच्या कालावधीत 'गझलरंग' एकूण सत्तावीस मुशायरे झालेत.पणजीत दोन,मुंबईसह महाराष्ट्रातील वेगवेगळ्या ठिकाणी आठ आणि एस.एम.जोशी सभागृह पुणे येथे सतरा.यापैकी एक फक्त महिला गझलकारांचा आणि एक उर्दू-मराठी मिला-जुला...शहरी,ग्रामीण,वेगवेगळ्या व्यवसाय क्षेत्रातल्या अठ्ठेचाळीस गझलकारांनी या मंचावरून सादरीकरण केले.विशेष म्हणजे त्यापैकी पस्तीस गझलकार वय वर्षे २५ते४० या वयोगटातले.पुढच्या आठ मुशाय-यांचे

साहित्य संस्कृती

वेळापत्रक तयार आहे.खच्चून भरलेल्या प्रेक्षागृहात प्रसंगी खाली जमिनीवर बसून उसळून-उसळून दाद देणारे रसिक हे आमचे ऊर्जास्थान.मुंबईच्या URL फाऊंडेशनचे उदयदादा लाड आणि स्वतःचे नाव जाहीर न करण्याचे कडक बंधन घातलेले काही मित्र यांची साथ हे आमचे संचित.

या दमदार वाटचालीत बरीच तथ्ये सामोरी आली.अनेक खरे-खोटे चेहरे वाचता आले.पण दोन उल्लेखनीय बाबीः

१.महाराष्ट्रातील तरूण पिढी अत्यंत बाबदारीने,सातत्याने दमदार अस्सल,सकस,निर्दोष गझल लिहित आहे.

२."गायक गाण्याच्या कार्यक्रमाच्या माध्यमातून लोकांसमोर आणतो म्हणून हे गझलकार लोकांना माहीत होतात,आम्ही यांना मोठे करतो" अशा स्वरुपाची दर्पोक्ती एका स्वयंघोषित पंडित गायकाने काही वर्षांपूर्वी केली होती.ती किती पोकळ होती याचा अनुभव आला.

जवळ जवळ प्रत्येक महिन्यात पुण्यातील एस.एम.जोशी सभागृहात 'गझलरंग' मुशायरा सादर केला जातो.सहा वाजता एकही खुर्ची रिकामी नसते.नंतर आलेले सुमारे१००-१५० रसिक दोन रांगांच्या मध्ये खाली बसून असतात.टाळ्या,शिट्यांची बरसात सुरू असते.कुठल्याही वाद्याची अथवा कथित कमावलेल्या-गमावलेल्या पंडिती

गळ्याची साथ नसते.अगदी तरन्नुम मध्ये सुद्धा सादरीकरण न करण्याचे बंधन काटेकोरपणे पाळले जाते.

कधीतरी एका जाणकार रसिकमित्राने नोंदविलेल्या वैश्विक सत्याची अनुभूती प्रत्येक मुशायरा देऊन जातो.तो म्हणाला होता-

"अच्छे अल्फाज किसी भी मौसिकी के मोहताज नही होते ।"...

काही गझलकारांच्या निवडक रचना अनाहत च्या रसिक वाचकांसाठी सादर करीत आहे..

तमाम गझलरसिकांना "सुरेश भट गझलमंच"कडून मानाचा मुजरा !...

अनाहतचा डिसेंबर-२०१४ चा अंक मराठी गझल विशेषांक म्हणून काढायचे ठरवून त्याचे अतिथी संपादकत्व मला बहाल केल्याबद्दल सोनाली जोशी यांचे मन:पूर्वक आभार..

**-शाहीर सुरेशकुमार वैराळकर**
संस्थापक - अध्यक्ष
सुरेश भट गझलमंच, पुणे

# किती बोलायचे राहून गेले

किती बोलायचे राहून गेले
खरे सांगायचे राहून गेले...

जरी होतास तू माझ्याचपाशी
तुला शोधायचे राहून गेले...

कशी इतक्यात संध्याकाळ झाली
प्रकाशी न्हायचे राहून गेले...

दिले तू मागण्याआधीच सारे
तुला मी द्यायचे राहून गेले...

तुझी होते,तुझी तन-मन-धनाने
अहं' अर्पायचे राहून गेले...

**-संगीता जोशी**

## जगण्याचि न आस अता उरली

जगण्याचि न आस अता उरली
बस एक निरास  मनी  भरली...

नसतेच खरे नभ, वास्तवता
धरतीस कळूनहि  ती झुरली...

जग जंगल केवळ येथ पशू
नच मानव, मानवता नुरली...

तुज मोक्ष कसा मिळणार नरा
विषयाचिच ओढ मनी मुरली...

उमटे न तरंग मनावरती
कविताहि कशी सुचली, स्फुरली?...

**-संगीता जोशी**

## तू धुक्यासारखी मी उन्हासारखा

तू धुक्यासारखी मी उन्हासारखा
डाव नाहीच हा मांडण्यासारखा

चांदणे , पालवी , ऊन्ह वा सावली
स्पर्श नाही तुझा सांगण्यासारखा

ह्या जगाने दिली उत्तराला सजा
प्रश्न होता तुझाही गुन्ह्यासारखा

त्या तिथे दूरवर गंध गेला तुझा
मी रिकामा पुन्हा अंगणासारखा

हा खटाटोप आता दिलाश्यापरी
भूक मेल्यावरी रांधण्यासारखा

**-वैभव जोशी**

## वार्ता खरीच होती

वार्ता खरीच होती
गर्दी बरीच होती

कोठेतरीच आली
कोठेतरीच होती

छाया असून माझी
त्याच्या घरीच होती

पाऊल ठेवले मी
तेथे दरीच होती

आली, उडून गेली
संधी परीच होती

तुडवून घेत गेली
ती पायरीच होती

**-क्रांति**

## खोटा खोटा वारा वाहत आहे

खोटा खोटा वारा वाहत आहे
खोट्या पाचोळयाला उडवत आहे

लेप कुणाला लावायाचा आहे
रात्र नभावर चंद्र उगाळत आहे

त्या देहाच्या दरी डोंगरामध्ये
अजून माझा प्राण निनादत आहे

'शो'चे आहे झाड खरे हे नाही
कुठे पानगळ त्याला भिववत आहे

कोणीही भवताली नाही माझ्या
कुणीतरी पण माझ्यी सोबत आहे

**- वैभव देशमुख**

## संबंध कधी मी अपुला कोणाला सांगत नाही

संबंध कधी मी अपुला कोणाला सांगत नाही
पण गंध तुझ्या प्रेमाचा काळजात मावत नाही

एकदा तुला जो बघतो तो डोळस उरतो कोठे
जो पाहत नाही तुजला तो काही पाहत नाही

जी स्थिती मनाने केली ती कुणीच केली नव्हती
अन् कुणी पुढेही माझी करणार अशी गत नाही

आल्या दिवसाच्या मागे मी नुसता फिरतो आहे
काडीचे काम न मजला अन् घडिभर फुरसत नाही

सूर्याच्या भवती फिरते ही धरती किती युगांची
हा सूर्य मिठी एखादी देउन का टाकत नाही

हातात हात घेतो अन् भेटतो गळयाला आपण
जे तुला जाणवत नाही ते मला जाणवत नाही

एखाद्या खडकामधुनी जन्माला येते लेणे
एखाद्या खडकावरती रेषाही उमटत नाही

मी रात्र रात्र कवितेच्या पाण्यावर वाहत असतो
मी दिवस दिवस कुठल्याही काठाला लागत नाही

**- वैभव देशमुख**

## आभाळच कोसळले की मग कळून येते

आभाळच कोसळले की मग कळून येते
अपुल्यासाठी कोण खरे कळवळून येते

किती स्वस्त मिळतात अजुनही गजरे येथे
अजूनही स्वस्तात कुणी दर्वळून येते

मातीही सोकवली वाटे रसायनांना
नुसत्या घामावर कोठे हिरवळून येते

कोणासाठी पाउस नुसता पाउस नसतो
सर एखादी डोळ्यातुन ओघळून येते

'शाम' सहज का ओळ एकही येतच नाही
जी येते ती काळजास हिंदळून येते
**- शाम**

## पुढल्या जन्मी

जन्म मला तू द्यावा आन्दण...पुढल्या जन्मी;
या जन्माची नको आठवण...पुढल्या जन्मी!

या ही जन्मी चुकली नाही पायपीट ही;
नक्की नसेल ना रे वणवण...पुढल्या जन्मी.

हवाहवासा कधी वाटला आयुष्या तू;
असेल जगण्याचे आकर्षण...पुढल्या जन्मी!

तुझ्यविणा या सहा ऋतूंचे काय करू मी..
ऋतू सातवा होवू आपण...पुढल्या जन्मी.

राग अनावर होता होता आवरेन मी...
पण प्रेमावर नको नियंत्रण...पुढल्या जन्मी.

गत जन्माचा शाप दिला तू या जन्माला;
उ:शापाचे दे नंदनवन...पुढल्या जन्मी!

**-ममता सपकाळ**

# सुखाची आज अंतिम पातळी मी

सुखाची आज अंतिम पातळी मी;
तुला देऊन सारे मोकळी मी.

मला बांधून घेणारे कडे तू;
तुझ्याशी जोडलेली साखळी मी.

कुणाहीसारखा नाहीस तू ही;
तुलाही वाटते ना वेगळी मी!

तुझ्याविण वाटते वठल्याप्रमाणे;
तुला स्पर्शून होते कोवळी मी!

फुलाचे नाव तू ओठांस द्यावे
खुडावी पाकळीने पाकळी मी!

हवा होतास यासाठीच तेव्हा;
किती उपवास केले निर्जळी मी.

कधी तू ही पुसावे कंदिलाला..
कितीदा सांग झटकू काजळी मी.

**-ममता सपकाळ**

## केलेस तर हे एवढे उपकार कर

केलेस तर हे एवढे उपकार कर;
फेकून दे खंजिर फुलाने वार कर.

आहे तुझ्या हातात काही वेगळे?
असलेच तर दिवसा प्रभो अंधार कर.

आयुष्यभर रांगत कशाला राहिल्या;
सगळ्याच इच्छांची मना तू घार कर.

हंगाम हिरवा बारमाही पाहिजे;
यंदा तरी हे स्वप्न तू साकार कर.

भोगायचे आहे इथे चुकले कुणा?
चल संकटांना मोकळे घरदार कर.

येतोस तू...जातोस तू...मर्जी तुझी;
माझ्या मनाला तेवढे खिंडार कर!
**-मनिषा नाईक**

उल्केपरी चल सोडते आकाश मी;
तू काळजाचे एकदा 'लोणार' कर!

होते अहिल्या रोज माझी कैकदा;
रामा शिळा समजून तर उद्धार कर!

आतून तू सुरवात कर शोधायला;
दिसला कुठे माणूस तर जोहार कर.

**-मनिषा नाईक**

## बदलून आज पाहू काळासमान आपण

बदलून आज पाहू काळासमान आपण;
नात्याशिवाय वागू नात्यासमान आपण.

अंदाज तू कशाला लावायला निघाला;
नियती समोर जावू मर्दासमान आपण.

जगणार का सुखाने दु:खाशिवाय कोणी?
असले विचार करतो थोरासमान आपण.

ठेवायची कशाला माझी तुझी उधारी;
आता घरात वागू वाण्यासमान आपण.

कुठला हिशोब नाही कुठलेच भोग नाही;
धरती करायची का स्वर्गासमान आपण.

सगळ्याच वेदनांशी का एकरूप झालो;
आहोत ना मनाने पाण्यासमान आपण.

आयुष्यभर जळालो इतकी दिली परीक्षा;
होणार शेवटी पण सोन्यासमान आपण.

जगणे नको नकोसे वाटे मला तुलाही;
शून्यात जायचे का गर्भासमान आपण.

**-मनिषा नाईक**

## तो माझा

तो आला अन् दारी माझ्या बरसुन गेला
गोड गुलाबी संमोहन तो पसरुन गेला

माझा होता, केवळ माझा होता जेव्हा
बाकी नाती होता तेव्हा विसरुन गेला

रमले होते संसाराच्या खेळामध्ये
नाही कळले डाव कधी तो उधळुन गेला

नाते ताजे उरले नाही बाकी आता
आठव का मग श्वासांनाही उसवुन गेला

काळोखाची ओळख गहरी झाली होती
कां तो येवुन अंतर माझे उजळुन गेला

दरवळ सरला, सुकल्या होत्या माझ्या बागा
हलका शिडकावा का मजला फुलवुन गेला

**-जयश्री अंबासकर**

## मी या निष्कर्षाला आलो

बेपर्वा जगण्यातुन मी या निष्कर्षाला आलो;
पडू नये हा प्रश्न कुणाला, का जन्माला आलो?

फक्त तुझ्याशी करतो देवा बरोबरी मी माझी;
आपण दोघे कधी कुणाच्या उपयोगाला आलो?

प्रश्न तसाही श्रीमंतांच्या अस्तित्वाचा होता;
उगाच का इतकेजण गरिबाच्या पोटाला आलो!

भरल्या ताटावरही काढावा पोटाला चिमटा;
त्यांनी त्यांची भूक मिटवली;मी उष्ट्याला आलो!

तुकड्या तुकड्यातुनही तू आजन्म राहिलिस माझी;
तुला वगळले तर,मी सगळयांच्या वाट्याला आलो.

डोळयांच्या काठावर आता काहिच साचत नाही;
कुणास ठाउक दुनियेच्या कुठल्या टोकाला आलो!

नक्की काहीतरी चिरडले चाकाखाली माझ्या;
कुठे जायचे होते मी कुठल्या गावाला आलो!

**-सुधीर मुळीक**

# दोघात हजारो मैलांचे अंतर येऊ शकते

दोघात हजारो मैलांचे अंतर येऊ शकते;
पण कातरवेळ तुझ्याही दारावर येऊ शकते!

तू आली,नाही आली; दोन्ही वेळा जिवघेण्या;
आता बघुया कुठली वेळ अगोदर येऊ शकते!

शेवटच्या घटकेआधी आलिस तर आहे सुटका;
नंतर या सगळयाचे नाव तुझ्यावर येऊ शकते.

काय फुलांना सांगू माझ्या पानगळीचा दरवळ;
मी ओघळलो तर डोळयातुन अत्तर येऊ शकते!

या डोहाला ठाउक नाही तळ माझ्या डोळयांचा;
ही दुनिया बुडेल इतके पाणी वर येऊ शकते!

कुठल्याही सूर्याला मी मावळलो नाही कारण
आयुष्याच्या संध्याकाळी उत्तर येऊ शकते.

**-सुधीर मुळीक**

## मनाला आपल्या समजावतो आपण

मनाला आपल्या समजावतो आपण;
खरे-खोटे खरेतर जाणतो आपण.

नको तेव्हाच जातो तोल दोघांचा...
हवा तेव्हा किती सांभाळतो आपण!

मनामध्ये तुझे येणे असे माझ्या..
जसा की श्वास घेतो-सोडतो आपण.

पुन्हा देऊन जातो चाट मुद्द्याला;
शिताफीने अवांतर बोलतो आपण.

नशा मिस-यातली होते तुझ्यालेखी;
अताशा सोवळयाने भेटतो आपण.

तुझ्या-माझ्यातल्या भिंतीस पाडूया ?
नको तेथे उगाचच खोदतो आपण!

**-सुप्रिया जाधव**

## मला जेव्हा समेवर यायचे असते

मला जेव्हा समेवर यायचे असते;
लयीला नेमके बिनसायचे असते.

तुला वाटेल 'ते ते' स्पष्ट केले तू;
तिला वाटेल जे वाटायचे असते!

प्रकाशाचा पुढे पर्याय असतो पण
धुक्यामध्येच रेंगाळायचे असते.

कधीही घे,कितीदाही परीक्षा घे;
इथे उत्तीर्ण कोणा व्हायचे असते?

गजर बघ वास्तवाचा वाजतो आहे;
पुन्हा स्वप्नातुनी जागायचे असते.

**-सुप्रिया जाधव**

## चांदण्या मोजायची ही वेळ नाही

चांदण्या मोजायची ही वेळ नाही
फारसे बोलायचीही वेळ नाही
.
प्रश्न सारे हे पहा नापास झाले
उत्तरे शोधायची ही वेळ नाही

या नशेची दृष्ट काढू आज आपण
तोल सांभाळायची ही वेळ नाही

घे प्रचीती आज तू प्रात्यक्षिकांची
पुस्तके चाळायची ही वेळ नाही

विस्कटू दे केस तू समजाव त्यांना
मोगरा माळायची ही वेळ नाही

कोंडतो जर श्वास कोंडू दे जरासा
औषधे सुचवायची ही वेळ नाही

मोह कुठला हे परमकर्तव्य आहे
पाळ तू टाळायची ही वेळ नाही

या क्षणासाठीच जगलो आजवर मी
हातचे राखायची ही वेळ नाही

**-सदानंद बेंद्रे**

## तुझा फक्त साधा शहारा असावा

तुझा फक्त साधा शहारा असावा
पुरेसा मला तो इशारा असावा

दिशा मीच हेतुपुरस्सर बदलली
तुलाही नकोसा किनारा असावा

जरा केस तू सावरावेस तोवर
पदरही हवेवर भरारा असावा

तुझ्यासारखे कोण दिसले पहाटे
धुके नेसलेला निखारा असावा

तिथे नेटक्या काळजाच्या तळाशी
इथे घातलेला पसारा असावा

असे पाखरू जे उडालेच नाही
किती छान त्याचा पिसारा असावा

**-सदानंद बेंद्रे**

साहित्य संस्कृती

## सुखस्वप्न

सजल झाले नेत्र माझे ते तुला दिसतील का?
एकदा विश्वासले जे ते पुन्हा फसतील का?

हाय ती वचनेही खोटी आणि खोटे प्रेमही
कोरले हृदयांतरी जे शब्द ते पुसतील का?

स्मरते तुला का जिवलगा ती रात्र अजुनी चांदणी ?
अधीर होती स्पंदने जी ती आता असतील का?

भंगले सुखस्वप्न माझे पार ठिकऱ्या जाहल्या
कल्पिली होती सुखे जी ती कधी हसतील का?

मी कशाला, का करावी आर्जवे आता तुझी
भावना तुजलाच होत्या? त्या मला नसतील का?

**-नीता आंबेगांवकर**

# प्रार्थनेस काय ढोल पाहिजे

प्रार्थनेस काय ढोल पाहिजे
पोचला नभात बोल पाहिजे

चेह-यावरील दु:ख मोजण्या
घाव काळजात खोल पाहिजे

धाय मोकलीत आसवे नको
फक्त पापणीत ओल पाहिजे

दोर काचतोय जीवना तुझा
सावरावयास तोल पाहिजे

बोल कागदावरी हवा तसा
एरवी कवी अबोल पाहिजे

**--डॉ.कैलास गायकवाड**

## सुगंधी एक शिंपण

मोग-याने चौकशी दारात केली
तू कधी बहरायला सुरवात केली

कोवळे वय चांदण्यांचे तू कशाला?
येउनी स्वप्नी गुलाबी रात केली

देखण्या बेचैन अंधाराचसाठी
मी दिव्यासंगे  जिवाची वात केली

ऐनवेळी पावसाला काय सांगू ?
चार डोळ्यांनी किती बरसात केली

अत्तरावाचून तू ओली , सुगंधी -
एक शिंपण माझिया हृदयात केली

छेड अजुनी छेड नजरेची ग़जल ही

या घडीने वाह्वा! क्या बात केली

**-विजय आव्हाड**

## कसे पंजरी मी शरांच्या निजावे

कसे पंजरी मी शरांच्या निजावे, कुणी पार्थ नाही मला भेटला
कसे पान भागीरथीचे करावे, कुणी पार्थ नाही मला भेटला

सर्यींचे विषारी किती सर्प माझ्या मनी राहुनी दंश करतात पण
कसे खांडवाने मनाच्या जळावे, कुणी पार्थ नाही मला भेटला

किती शोधले सर्व भावात माझ्या, जगावेगळा सापडे ना कुणी
कसे स्वप्न मी द्रौपदीचे बघावे, कुणी पार्थ नाही मला भेटला

म्हणे एकनिष्ठा, "किती भाग्य माझे, पती मत्सरी लाभला तो मला"
"विभागून घेणे नसे त्यास ठावे; कुणी पार्थ नाही मला भेटला"

तसे घासतो विश्वविद्यालयी रोज खर्डे सुखेनैव प्राध्यापकी

कसे, 'भृंग', अध्याय अठरा रचावे, कुणी पार्थ नाही मला भेटला

**-मिलिंद फणसे**

## शब्दांत जितके गुंतावयाचे, गुंतून झाले

शब्दांत जितके गुंतावयाचे, गुंतून झाले

दे अर्थ आता जगण्यास; पुष्कळ झुलवून झाले

तुजवीण हाती काही न उरले माझे म्हणाया

बाकी जगावर केव्हाच पाणी सोडून झाले

पर्याय नाही होकार देण्यावाचून उरला

लाजून झाले, सारे बहाणे सांगून झाले

अद्याप आहे अंतर जरासे, तृष्णा जरासी

अद्याप कोठे लज्जित कळीचे उमलून झाले?

नाहीतरी ते पाऱ्याप्रमाणे निसटून जाते

उधळून यौवन टाकावयाचे ठरवून झाले

हा दोष नाही वेड्या वयाच्या वेड्या क्षणाचा

दोघात सारे समजून झाले, उमजून झाले...

**-मिलिंद फणसे**

# किंमत

कारणे होती तशी जागायला
चांदण्या मज यायच्या भेटायला

प्रश्न हा साधाच होता पण तरी
लागली ती कारणे शोधायला

मी जरी आता सुखी दिसतो तुला
खूप किंमत लागली मोजायला

काळजी माझी नका इतकी करू
काळजी लागेल ही बोचायला

बंद मी केले इथे उमलायचे
आणि ती आली फुले मागायला

हो मला म्हटलेस तू कविते जसे
मी खुळ्यागत लागलो वागायला

भाव मी दुखःस या थोडा दिला

आसवे ही लागली माजायला

माणसे येतील ही रस्त्यावरी

भूक आहे लागली बोलायला

**-अनिरुद्ध अभ्यंकर**

# ढोल

सांग माझे ढोल मी बडवू कशाला?
सूर्य मी आहेच तर मिरवू कशाला?

स्पर्श कर्जाऊ तिने काही दिलेले
रेशमी देणे असे चुकवू कशाला?

आत्मशोधाची कथा सांगून जाती
चेहऱ्यावरचे चरे लपवू कशाला?

जी कधीही माणसे घडवीत नाही
मी अशी मूर्ती तरी घडवू कशाला!

मी तुझ्या डोळ्यांमधे आकंठ बुडतो
दु:ख मग दारूमधे बुडवू कशाला?

ठिकठिकाणी फाटले नाते जरी हे
वीण आहे घट्ट तर उसवू कशाला?

**-मिलिंद छत्रे**

# आभाळरस्ता

पुढील दुव्यावर गझलेचा ऑडियो ऐकता येईल.

आभाळरस्ता

**लेखन आणि निवेदन- नचिकेत जोशी**

- **जानेवारीच्या अनाहतच्या अंकाकरता कविता जरूर पाठवा.** विषयाचे बंधन नाही, पाठवलेली रचना,एखाद्या कवितेवरील वा कवितासंग्रहावरील मत हे फक्त स्वत:चे असावे हीच एक अट आहे.

- **फेब्रुवारीचा यंदाचा अनाहत असेल कॉलेजकवी विशेषांक.**

  या विशेषांकामध्ये महाविद्यालयात शिक्षण घेत आहेत अशा कवी आणि कवयित्रीच्या कविता प्रकाशित केल्या जातील. या अंकाकरता केवळ प्रेमकविता पाठवायची असं नाही. कुठल्याही विषयावरील कविता चालतील, फक्त त्या कॉलेजविद्यार्थ्यांनी केलेल्या असाव्यात एवढीच अट आहे.

**तुमच्या उत्तमोत्तम कविता आम्हाला जरूर पाठवा.**

ईमेल आहे- anahatmagazine@gmail.com
धन्यवाद.




प्रकाशक- साहित्यसंस्कृती प्रकाशन
www.sahityasanskruti.com
संपादन- सोनाली जोशी
संपादन सहाय्य- कामिनी केंभावी
मुखपृष्ठ -मयूर  कुलकर्णी(atizmayur@gmail.com)
विशेष आभार- सुरेशकुमार वैराळकर

*All rights reserved. No part of these poems can be published without the written consent of the poet/poetess.*

To submit your poems/ writing/join the team please email to-

anahatmagazine@gmail.com

On Facebook at

www.facebook.com/sahityasanskruti

***Thank You!***